थेट दूरध्वनी :-०२२२४९४५३३९ EXT १२०
ई-मेल:- piadmn.traffic@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र
शासन

पोलीस सह आयुक्त, वाहतुक, मुंबई
यांचे कार्यालय,सर पोचखानवाला
रोड,वरळी,मुंबई- ४०००३०

OW :- 118 /PI(Adm)/Traffic/2025

Date :- 13 /01/2025

प्रति,

मा. पोलीस उप आयुक्त, (अभियान),
कक्ष-११ ( बंदोबस्त शाखा),
मा. पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई

**विषय :-** टाटा मुंबई मॅरेथॉन २०२५ स्पर्धेच्या आयोजनाकरीता वाहतुक शाखेचे ना- हरकत प्रमाणपत्र बाबत...

संदर्भ:- O.W.NO CP/Desk-11(6)/GKS/5465/2024 Date 12/10/2024

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून अर्जदार Balasaheb Kolase Patil, I.A.S.(Retd) Sr. Vice President Coordination, Tata Mumbai Marathon, Procam International Pvt.Ltd. 14, St. James Court, Marine Drive Mumbai 20 यांना दिनांक १९/०१/२०२५ रोजी सकाळी ०५.०० ते १४.०० वा. यावेळेत मुंबई मॅरेथॉन २०२५ स्पर्धेच्या आयोजनाकरीता वाहतुक शाखेतर्फे वाहतूकच्या दृष्टीकोनातून खालील नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहुन परिशिष्ट 'अ' मधील मार्गावर ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मा. पोलीस सह आयुक्त, वाहतुक, मुंबई यांनी शिफारस केली आहे.

**-: टाटा मुंबई मॅरेथॉन २०२५ स्पर्धेचे प्रकार :-**

| अ.क्र. | स्पर्धेचे स्वरूप | अंतर | एकुण स्पर्धक | सुरू होण्याची वेळ व ठिकाण | स्पर्धा संपण्याची वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मॅरेथॉन अमॅचुर | ४२.१९५ कि.मि. | ९००० | ०५.०० वा. सीएसटिएम | १२.३० वा. ओसिएस चौकी |
| २ | हाफ मॅरेथॉन आणि पोलीस कप | २१.०९७ कि.मि. | १३००० आणि पोलीस कप ५० स्पर्धक अंदाजे | ०५.०० वा. माहिम रेती बंदर मैदान, माहिम चौकी | ०९.१० वा. ओसिएस चौकी |
| ३ | १० कि.मि.रन | १० कि.मि. | ७२०० | ०६.०० वा. सीएसटिएम | ०७.५८ वा. ओसिएस जंक्शन |
| ४ | मॅरेथॉन एलिट रेस | ४२.१९५ कि.मि. | २०० | ०७.२० वा. सीएसटिएम | १०.५० वा. सीएसटिएम |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | चॅम्पीअन्स विथ डिसेबीलीटी रन | अंदाजे १.३ कि.मि. | २००० | ०७.२२ वा. सीएसटिएम | ०८.०५ वा. ओसिएस चौकी |
| ६ | सिनीअर सिटीझन्स् रन | अंदाजे ४.२ कि.मि. | २००० | ०७.३५ वा. सीएसटिएम | ०९.०५ वा. मेट्रो सिनेमा, एम.जी रोड |
| ७ | ड्रिम रन | अंदाजे ५.९ कि.मि. | २०००० | ०८.०५ वा. सीएसटिएम | १०.५५ वा. मेट्रो, एम.जी रोड |

**-: अटी व शर्ती :-**

१ सदर मॅरेथॉन स्पर्धेचा मार्ग सोबत जाडण्यात आला आहे. **( परिशिष्ट 'अ')**

२ स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धक, त्यांचे नातेवाईक, निमंत्रीत प्रतिष्ठीत मान्यवर इत्यादी याचेंकरीता वाहन पार्किंगची व्यवस्था कोठे करणार याची माहिती तसेच सर्व स्पर्धा प्रकारासाठी कोणत्या ठिकाणी स्पर्धक जमणार आहेत व कोठुन ते निघून जाणार आहेत त्या स्थळांची माहिती वाहतुक शाखेत आगाऊ कळवावी.

३ आझाद मैदान येथे शर्यत सुरू होताना शर्यतीची मार्गीका अरुंद नसावी जेणे करून चेंगराचेंगरी होणार नाही याकडे आयोजकांनी लक्ष पुरवावे. तसेच स्पर्धकांची संख्या मर्यादीत ठेवावी.

४ आयोजकानी अग्निशमन दलाचे वाहने, रूग्णवाहिका व दुध भाजीपाला, गॅस इत्यादी आत्यावश्यक वाहनास जाण्या-येण्यास अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५ स्पर्धामार्गावर आवश्यक संखेत मोबाईल सी.सी.टी.व्ही. ची व्यवस्था करावी. सदर सी.सी.टी.व्ही. वरील स्पर्धा कालावधीतील सर्व चित्रण वाहतुक नियंत्रण शाखेस सीडी / हार्ड डिस्क यातुन तात्काळ पुरवीण्यात यावे.

६ आझाद मैदान येथे शर्यतीच्या सुरवातीस व बांद्रा रिक्लमेशन या टप्प्यांच्या ठिकाणी तसेच शर्यतीच्या मार्गावर पोलीसांसाठी टेहळणी मनोरे व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आयोजकांनी बसवावे. सी.सी.टी.व्ही. द्वारे करण्यात आलेल्या चित्रीकरणाची चित्रफीत पोलीसांना उपलब्ध करून दयावी.

७ प्रत्येक स्पर्धा प्रकारांचे तपशील,जसे सुरू होण्याचे व समाप्त होण्याचे ठिकाण, त्याठिकाणी किती आकाराचा स्टेज उभारण्यात येणाार ? तो कोठे असणार ? मार्गावर ठिकाठिकाणी मदत स्थळे/ मंच कोठे उभारणाार ? ती ठिकाणे ? कोणकोणत्या ॲम्बुलन्सेस, डॉक्टर टीमस् पुरविण्यात येणार यांची सविस्तर माहिती ? वाहन क्रमांक , संबंधीताचे संपर्क क्रमांक इत्यादी माहिती वाहतुक विभागास आगाऊ सादर करावी. मंच व स्टेज उभारण्यासाठी संबंधीत विभागाकडून आयोजकांनी परवानगी घ्यावी.

८ शर्यतीच्या मार्गावर स्पर्धकांच्या सुरक्षतेसाठी आयोजकांनी खाजगी सुरक्षा रक्षक नेमावेत, शर्यतीचा सुरवातीचा टप्पा आझाद मैदान येथे व शर्यतीचा अंतिम टप्पा एम.एम.आर.डी.ए ग्राऊड येथे तसेच सर्व मार्गावर सुरक्षतेसाठी आयोजकांनी खाजगी सुरक्षा यत्रणेमार्फत तपासाणी करून घ्यावी व

उचित मार्गावर संख्येने एच.एच.एम.डी/ डी.एफ.एम.डी. तैनात करावेत.

९ वृध्द, महिला, बालक, व विकलांग स्पर्धेसाठी विशेष व्यवस्था व जबाबदारी घ्यावी.

१० बॅगेज व तत्सम वस्तूच्या तपासाणीसाठी एक्सरे स्कॅनर बसविण्यात यावे. तसेच अशा वस्तु रॅलीत भाग घेण्याऱ्या व्यक्तीनां वितरण करू नये.

११ मॅरेथॉन,अर्ध मॅरेथॉन, व्हिलचेअर इव्हेंट, सिनियर सिटीझन रन, ड्रीम रन, यासर्व स्पर्धा मार्गावर आवश्यक त्या सर्व ठिकाणी वाहतुक पोलीसांच्या निर्देशनानुसार बॅरिकेटींग करावे ज्या ठिकाणी वाहतुक पोलीसांना लोखंडी मुव्हेबल बॅरिकेटची आवश्यकता आहे ते सर्व त्याचप्रमाणे दोरखंड आदि वाहतुक शाखेस पुरविण्यत यावे

१२ आयोजकांनी वाहतुक शाखेच्या आवश्यतेप्रमाणे वाहतुक व्यवस्थेकरीता आवश्यकत्याबाबी /सुविधा उदा. कॉन्स,बॅरीकेडची रोप्स बुथ, इत्यादी पुरविण्याची व्यवस्था करावी

१३ मॅरेथॉन स्पर्धा मार्गावर वाहतुक नियमन व नियत्रंण करण्यासाठी आवश्यक असे ट्रफिक सायनेजेस्, पुरेसे कोन्स, बोलार्डस रोप्स,सुचना फलक इत्यादी साहित वाहतुक नियंत्रण शाखेस पुरविण्यात यावे.

१४ बांद्रा - वरळी सी लिंक वरून स्पर्धा मार्ग असल्याने एम.एम.आर.डी.ए.ची देखील परवानगी घेण्यात यावी.

१५ प्रमाण पत्राचे वितरण व्यवस्थीत होण्याकरीता जास्तीत जास्त काऊंटर ठेवावेत.

१६ मुंबई महानगरपालिकेकडून अधिकृत केलेल्या वाहने पार्किंगच्या जागेची माहिती स्पर्धेत भाग घेणाऱ्यांना व आमत्रितांना वितरीत कराव्यात.

१७ स्पर्धेकांच्या संपूर्ण सुरक्षेची जबाबदारी आयोजकांवर राहिल

१८ स्पर्धेकांना मोबाईल/ मौलवान वस्तु न बाळगण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

१९ मॅरेथॉन मार्गाच्या महत्वाच्या मध्यवर्ती ठिकाणी जाहिरातीचे फलक लावू नये.

२० वाहतुक परिवर्तनासंबंधी आयोजकांनी मोठया प्रमाणावर जाहिरात करावी.

२१ सदर कार्यक्रमाच्या वेळी फक्त मेगाफोनचा वापर करावा. ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. चालत्या वाहनांवर धनिक्षेपकाचा वापर करण्यास मनाई आहे.

२२ मॅरेथॉन आयोजकांचे वाहनांचा रहदारीस अडथळा होता कामा नये.

२३ स्पर्धा मार्गावर सर्वत्र आयोजकांनी स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना त्याचप्रमाणे सर्व जनतेस गैरसोय, अडचणी येवू नयेत याकरीता वाहतुक शाखेच्या निर्देशानुसार पुरेशा प्रमाणात स्वंयसेवक ठेवावेत.

२४ सदर कार्यक्रमाच्या वेळी नेहमीच्या वाहतुकीस पादचाऱ्यांना कोणत्याही कार्यक्रमांचा अडथळा होवू देवू नये.

२५ ज्या ठिकाणी ध्वनिक्षेपकाची आवश्यकता असेल त्या ठिकाणी ध्वनिक्षेपक उच्च न्यायालयाच्या आदेशाची तंतोतंत पालन करण्यात यावे तसेच ध्वनिप्रदुषण नियमांचे उल्लधंन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२६ सदर कार्यक्रमाच्या संदर्भात जिल्हाधिकारी , बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई पोर्ट ट्रस्ट इतर शासकीय कार्यालयांच्या परवानगीची आवश्यकता असल्यास तशी परवानगी आयोजकांनी परस्पर घ्यावी.

२७ सदर कार्यक्रमाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता आयोजकांनी स्वतः घ्यावी. अनुचित प्रकार घडल्यास आयोजकांना जबाबदार धरण्यात येईल.

२८ मॅरेथॉन मार्गावरील डि.एन.रोड कॅपीटल सिनेमाजवळ ईलाईट ॲथर्लेट टेंन्ट तात्पुरत्या स्वरूपात उभा राहणार आहे. तो वाहतुकीला अथवा जनतेला अडथळा निमार्ण होणार नाही असा असावा. त्याबाबत संबंधीत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करावी. परिस्थीतीनुरूप तंबू काही आपत्कालीन परिस्थीती उद्‌भवल्यास तात्काळ काढुन घेण्यात यावा.

२९ मॅरेथॉन मार्गावर जे बोर्ड/बॅनर्स लावले जाणार आहे त्यामुळे वाहतुकीस व जनतेस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३० मॅरेथॉन मार्गावर ज्या लीड कार, पायलट कार, स्लीपर बस, टेल कार, एस्कॉट पायलट बाईक इत्यादी धावणार आहेत परिस्थीतीनुरुप त्यांना प्रतिबंध करण्याचा अधिकार पोलीसांकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

३१ बंदोबस्तावर असलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या सर्व कार्यदेशीर आदेशांचे पालन आयोजकांनी करावे. तसेच **सदरील बंदोबस्त हा प्रचलीत नियमानुसार शासकीय देय दराने ( On Payment Basis ) देय राहिल त्याबाबतचे शुल्क भरणे आयोजकांना बंधनकारक राहिल.**

३२ वाहतुक पोलीस अधिकारी/ व अंमलदार यांनी वाहतुक व्यवस्थापनेच्या दृष्टीकोनातुन केलेल्या सर्व सुचना/निर्देश यांचे पालन मॅरेथॉन आयोजक, पदाधिकारी व स्वंयसेवक करतील.

३३ वरील सर्व अटी व शर्तीचे पालन कार्यक्रमातील सर्वजण करतील याची जबाबदारी आयोजकांवर राहील

३४ सदर कार्यक्रमाच्या वेळी वाहतुकीच्या तसेच कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निमार्ण होणार नाही याची जबाबदारी आयोजकांवर राहील.

३५ मॅरेथॉन कालावधीमध्ये मॅरेथॉनकरीता येणाऱ्या वाहन चालकांचे मार्गदर्शनास्तव आयोजकांनी सुरक्षा रक्षक व ट्रॅफिक वॉर्डनर्स् संबंधीत वाहतुक विभाग यांचे मार्गदर्शनानुसार ठिकठिकाणी तसेच प्रत्येक जंक्शनवर स्वयंसेवक नेमण्यात यावेत व त्यांना त्यांची कर्तव्य समजावून सांगावीत.

३६ स्पर्धा मार्गावरील रस्त्याचे दुरूस्ती व देखभाल करणारे सरकारी विभाग व प्राधिकरणांच्या मदतीने रस्त्यावरील खड्डे दुरूस्ती तात्काळ करून घ्यावी.

३७ मार्गास देण्यात आलेली मान्यता कोणत्याही क्षणी आणि कोणत्याही कारणाशिवाय रद्द करण्याचे अधिकार पोलीसांकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत

३८ मॅरेथॉनच्या वेळी अपघात घडल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आयोजकांची राहिल.

३९ कोविडी-१९ या विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुर्नवसन, आरोग्य पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधीत महापालिका, पोलीस स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४० मॅरेथॉनच्या वेळी अशी कोणतीही कृती करणार नाही जेणकरुन कोरोना विषाणुचा फैलाव होणार नाही. असे आढळून आल्यास साथरोग कायदा १८९७, राष्ट्रीय आपत्ती निवारण कायदा २००५, व भा.द.वी. कायदयान्वये कारवाईस पात्र होतील.

४१ नमुद सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याची जबाबदारी आयोजकांवर राहील. वर नमुद अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटी व शर्तीचा उल्लधंन झाल्यास आयोजकांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**मा. पोलीस सह आयुक्त, वाहतुक, मुंबई यांच्या मान्यतेने**

१३/१/२०२५

**( महेश सुभाष तांबे )**
प्रभारी पोलीस निरीक्षक,(प्रशासन),
वाहतूक पोलीस मुख्यालय,मुंबई.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**

१ मा. अपर पोलीस आयुक्त, वाहतुक, मुंबई
२ मा. पोलीस उप- आयुक्त, ( अभियान ), कक्ष-११, पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
३ मा. पोलीस उप- आयुक्त मुख्यालय व मध्य, दक्षिण, वाहतुक, मुंबई

**प्रत अग्रेषित :-**

१ मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (दक्षिण,मध्य-पुर्व, मध्य, पुर्व व पश्चिम) परिक्षेत्र वाहतुक मुंबई.
२ व.पो.नि./प्र.पो.नि. कुलाबा,काळबादेवी, ताडदेव, वरळी, दादर, माहिम, व बांद्रा वाहतुक विभाग व वाहतुक नियंत्रण कक्ष, मुंबई
३ अर्जदार Balasaheb Kolase Patil, I.A.S.(Retd) Sr. Vice President Coordination, Tata Mumbai Marathon, Procam International Pvt.Ltd. 14, St. James Court, Marine Drive Mumbai 20

**परिशिष्ट 'अ' टाटा मुंबई मॅरेथॉन २०२५ दि. १९/०१/२०२५ रोजी स्पर्धेकरीता दिलेला मार्ग**

**मॅरेथॉन (ॲम्युचर्स):-**

**सदरची रन मॅरेथॉन अमॅचुर ही ४२.१९५ कि.मि.ची असून ती सकाळी ०५.१५ मिनीटांनी सीएसटीएम समोर या ठिकाणी सुरू होणार असुन, स्पर्धेचा शेवट ओ. सी. एस. चौक मार्ग येथे होणार आहे. सदर स्पर्धेचा मार्ग खालील प्रमाणे आहे.**

सी.एस.एम.टी.-डॉ.डी.एन.रोड-उजवे वळण वीर नरीमन रोड-डावे वळण कर्मवीर भाऊराव पाटील मार्ग - आंबेडकर पुतळा- उजवे वळण - मादाम कामा रोड-महर्षी कर्वे रोड -डावे वळण-वीर नरीमन रोड -डावे वळण एन.एस.रोड - डावे वळण - विनय के. शहा मार्ग- यु टर्न - एन एस रोड - एअर इंडीया बिल्डींग जंक्शन - परत मरिन ड्राईव्ह ते गिरगाव चौपाटी - उजवे वळण - बाबुलनाथ मार्ग- डावे वळण- एन. एस. पाटकर मार्ग केम्स कॉर्नर - फ्लायओवर ब्रिज- हाजीअली जंक्शन- लाला लजपत राय मार्ग- डॉ. अन्नी बेसंट रोड - - लव ग्रोव्ह ब्रिज खालुन डावे वळण - खान अब्दुल गफार खान रोड - बांद्रा- वरळी सी लींक- टोल प्लाझा- माहिम कॉजवे जंक्शन - उजवे वळण - जनर अरूण कुमार वैद्य मार्ग ( स्वामी विवेकानंद मार्ग) - माहिम चर्च जंक्शन - उजवे वळण - कॅडल रोड - - स्वांतत्रवीर सावरकर मार्ग- सिध्दीविनायक मंदीर जंक्शन - डॉ बेझंट रोड- ग्लॅक्सो जंक्शन - पोतदार हॉस्पिटल जंक्शन - उजवे वळण - थडानी मार्ग - बिंदु माधव चौक - डावे वळण - वरळी डेअरी- लव ग्रोव्ह ब्रिज- डावे वळण - ॲनी बेडंट रोड वरळी नाका यु टर्न - लव ग्रोव्ह ब्रिज- लाला लजपत राय मार्ग - हाजी अल्ली जंक्शन - केम्स कॉर्नर ब्रिज - आरटीआ जंक्शन - उजवे वळण -

बाबुलनाथ मार्ग - डावे वळण - बॅन्ड स्टॅन्ड - डॉ. एन.एस. पुरंदरे मार्ग - विर नरीमन रोड - सि.टी.ओ. जंक्शन - डावे वळण - ओ. सी. एस. जंक्शन येथे समाप्त

**-: मॅरेथॉन (एलिट रन ):-**

**सदरची मॅरेथॉन सदरची रन मॅरेथॉन ईलीयट रन ही ४२.१९५ कि.मि.ची असून ती सकाळी ०७.२० मिनीटांनी सीएसएमटी येथून सुरू होवुन १०.५० वा समाप्त होणार आहे.**

सुरवात सी.एस.एम.टी.-डॉ.डी.एन.रोड-उजवे वळण वीर नरीमन रोड-डावे वळण कर्मवीर भाऊराव पाटील मार्ग -उजवे वळणे - मादाम कामा रोड-उज़वे वळण - महर्षी कर्वे रोड - चर्च गेट जंक्शन - उजवे वळण - विर नरीमन रोड - उजवे वळण - कर्मवीर भाऊराव पाटील मार्ग - उजवे वळण - माधम कामा रोड - उजवे वळण - महर्षि कर्वे रोड - डावे वळण - विर नरीमन रोड - डावे वळण - एन.एस. रोड - यु टर्न - एअर इंडीया बिल्डींग जंक्शन - मरीन ड्राईव्ह ते गिरगाव चौपाटी - उजवे वळण - बाबुलनाथ मार्ग - डावे वळण - एन. एस. पाटकर केम्स कॉर्नर ब्रिज- हाजीअली जंक्शन- लाला लजपत राय मार्ग- डॉ. अन्नी बेसंट मार्ग - लव ग्रोव्ह ब्रिज खालुन डावे वळण - खान अब्दुल गफाार खान रोड - बांद्रा- वरळी सी लींक- टोल प्लाझा- बांद्रा - माहिम कॉजवे जंक्शन उजवे वळण - जनर अरूण कुमार वैद्य मार्ग ( स्वामी विवेकानंद मार्ग) - माहिम चर्च जंक्शन - उजवे वळण - कॅडल रोड - - स्वांतत्रवीर सावरकर मार्ग- सिध्दीविनायक मंदीर जंक्शन - डॉ बेझंट रोड- ग्लॅक्सो जंक्शन - पोतदार हॉस्पिटल जंक्शन - उजवे वळण - थडानी मार्ग - बिंदु माधव चौक उजवे वळण - आ.एन.एस. त्राता - नारायण हर्डीकर मार्ग - यु टर्न - आ.एन.एस. त्राता - खान अब्दुल गफाार खान मार्ग - वरळी सि. फेस - वरळी डेरी - लव ग्रोव्ह ब्रिज खालुन उजवे वळण -डॉ. ॲनी बेझंड रोड - लोटस जंकशन - एन.एस.सी.आय - लाला लजपत राय मार्ग - हाजी अल्ली जंक्शन - महालक्ष्मी जंक्शन - पेडर रोड ( गोपाळराव देशमुख मार्ग ) केम्स कॉर्नर ब्रिज - आर.टी.आय. जंक्शन - उजवे वळण - बाबुलनाथ मार्ग - डावे वळण - बॅन्ड स्टॅन्ड - डॉ. एन.एस. पुरंदरे मार्ग - गिरगाव चौपाटी - सुदर महल जंक्शन - विर नरीमन रोड - हुतात्मा चौक डावे वळण - डि.एन.रोड डावे वळण - सी.एस.एम.टी जंक्शन येथे समाप्त.

**-: हाफ मॅरेथॉन :-**

**सदरची मॅरेथॉन स्पर्धा ही २१.०९७ कि.मि.ची असून ती सकाळी ०५.०० मिनीटांनी माहीम रेती बंदर ग्राउंड माहीम कॉजवे येथुन सुरू होणार आहे. सदर मॅरेथॉनचा मार्ग खालील प्रमाणे आहे.**

सुरवात माहीम रेती बंदर - पोलीस उप आयुक्त, परीमंडळ -५ कार्यालया समोरील मैदान - जनर अरून कुमार वैद्य मार्ग (स्वामी विवेकानंद मार्ग )- कोंबडी गल्ली - बांद्रा रिक्लेमेशन - वरळी सि.लींक टोल प्लाझा - वरळी सि लिंक गेट डावे वळण - जे.के. कपुर चौक ( आय.एन.एस.त्राता) उजवे वळण - खान अब्दुल गफार रोड- बिंदु माधव जंक्शन डावे वळण - थंडानी मार्ग - पोद्दार जंकशन डावे वळण - डॉ. ॲनी बॅझेंट रोड - गॅल्स्को जंक्शन य टर्न - डॉ. ॲनी बेझट रोड - पोदफदार जंक्शन उजवे वळण - थंडानी मार्ग - बिंदु माधव चौक डावे वळण - वरळी दुध डेअरी - खान अब्दुल खफार खान मार्ग - लव ग्रोव्ह ब्रिज खालुन डावे वळण - डॉ. ॲनी बेझंड रोड - यु टर्न वरळी नाका (

आचार्य आत्रे चौक ) लोटस जंक्कशन - एन.एस.सी.आय - लाला लजपत राय मार्ग - हाजी अल्ली जंक्शन - महालक्ष्मी जंक्शन - पेडर रोड ( गोपाळराव देशमुख मार्ग ) केम्स कॉर्नर ब्रिज - आर.टी. आय. जंक्शन - उजवे वळण - बाबुलनाथ मंदिर - बॅन्ड स्टॅन्ड - डॉ. एन.एस. पुरंदरे मार्ग - गिरगाव चौपाटी - सुदर महल जंक्शन - विर नरीमन रोड - पारसी विहिर पासुन - डावे वळण - कर्म विर भाऊराव पाटील मार्ग - ओ.सी.एस. जंक्शन येथे समाप्त.

**-:१० कि.मि. रन :-**

**सदर मॅरेथॉन स्पर्धा ही १० कि.मि.ची असून ती सकाळी ०६.०० मिनीटांनी सीएसएमटी या ठिकाणी सुरू होणार असुन, सदर स्पर्धेचा मार्ग खालील प्रमाणे आहे.**

सुरवात सी.एस.एम.टी. - डी.एन.रोड- हुतात्मा चौक - वीर नरीमन रोड डावे वळण- कर्मवीर भाऊराव पाटील मार्ग-उजवे वळण-मादाम कामा रोड-उजवे वळण महर्षी कर्वे रोड-डावे वळण वीर नरीमन रोड-डावे वळण एन.एस.रोड - यु टर्न ऑबेरॉय हॉटेल जंक्शन - मरीन ड्राईव्ह - यु टर्न तारापोरवाला मत्सालय- मरीन लाईन्स स्टेशन- वीर नरीमन रोड- चर्चगेट जंक्शन- के. बी. पाटील मार्ग- ओ. सी. एस. जंक्शन येथे समाप्त.

**-: चॅम्पीयन्स विथ डिसेबीलीटी रन :-**

**सदर मॅरेथॉन स्पर्धा ही १.३० किमी अपंग स्पर्धकांसाठी असुन ती सकाळी ०७.२२ मिनीटांनी सीएसएमटी येथुन सुरू होणार आहे. सदर स्पर्धेचा मार्ग खालील प्रमाणे आहे.**

सुरवात सी.एस.एम.टी. - डॉ. डी.एन.रोड- हुतात्मा चौक- वीर नरीमन रोड - उजवे वळण- कर्मवीर भाऊराव पाटील मार्गाने-ओसीएस जंक्शन-येथे समाप्त

**-: सीनीअर सिटीझन रन :-**

**सदरची स्पर्धा ही वयस्कर नागरीकांसाठी असुन ती ४.२ कि.मि. ची आहे. ती सकाळी ०७.३५ मिनीटांनी सीएसएमटीयेथुन सुरू होणार आहे. सदर स्पर्धेचा मार्ग खालील प्रमाणे आहे.**

सुरवात सी.एस.एम.टी.-डॉ.ड़ी.एन.रोड-उजवे वळण-वीर नरीमन रोड-किलाचंद चौक - एन. एस. रोड - उजव्या बाजुने यु टर्न - प्रिसेस फ्लायओवर ब्रिज वरती - पारसी जिम खाना - पारसी डेरी - शामलदास गांधी मार्ग - उजवे वळण- जगन्नाथ शंकर शेठ मार्ग (गिरगाव रोड)- मेट्रो जंक्शन येथे समाप्त.

**-: ड्रिम रन :-**

**सदरची स्पर्धा ही ५.९ कि.मि.ची आहे. ती सकाळी ०८.१५ मिनीटांनी सीएसएमटी येथुन सुरु होणार आहे. सदर स्पर्धेचा मार्ग खालील प्रमाणे आहे.**

सुरवात सी.एस.एम.टी. - डी.एन.रोड - हुतात्मा चौक उजवे वळण वीर नरीमन रोड-डावे वळण-एन एस रोड-ऑबेरॉय हॉटेलच्या दिशेने - यु टर्न-एन.सी.पी.ए-एन.एस.रोड -प्रिन्सेस फ्लाय ओवर ब्रिज येथुन उजव्या बाजुने यु टर्न- प्रिसेस फ्लायओवर ब्रिज - पारसी डेरी - शामलदास गांधी रोड-उजवे वळण - जगन्नाथ शंकर शेठ मार्ग (गिरगाव रोड)-मेट्रो जंक्शन येथे समाप्त

वर नमूद शर्ती व अटी यापैकी कोणत्याही शर्तीचा/अटीचा आयोजकांकडून व त्यांच्या प्रतिनिधी यांच्याकडून उल्लघंन झाल्यास सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल याची कृपया नोंद घ्यावी.

**मा. पोलीस सह आयुक्त, वाहतुक, मुंबई**
**यांच्या मान्यतेने**

13/01/2025

**( महेश सुभाष तांबे )**
प्रभारी पोलीस निरीक्षक (प्रशासन),
वाहतूक पोलीस मुख्यालय,मुंबई.

**प्रत माहितीस्तव सविनय सादरः-**

१ मा. अपर पोलीस आयुक्त, वाहतुक, मुंबई
२ मा. पोलीस उप- आयुक्त, ( अभियान ), पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
३ मा. पोलीस उप- आयुक्त, मुख्यालय व मध्य, दक्षिण, वाहतुक, मुंबई

**प्रत अग्रेषित :-**

१ मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( दक्षिण, दक्षिण-मध्य,मध्य-पश्चिम,मध्य) परिक्षेत्र वाहतुक मुंबई.
२ व.पो.नि. /प्र.पो.नि. आझाद मैदान, कुलाबा,मरीन ड्राईव्ह, काळबादेवी, डि.बी.मार्ग, ताडदेव, वरळी, दादर, माहिम व बांद्रा वाहतुक विभाग व नियंत्रण कक्ष, मुंबई
३ अर्जदार Balasaheb Kolase Patil, I.A.S.(Retd) Sr. Vice President Coordination, Tata Mumbai Marathon, Procam International Pvt.Ltd. 14, St. James Court, Marine Drive Mumbai 20